# प्रकरण बावीस
# लायसन्स आणि परवाने

## एक
## सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांस लायसन्स देणे

**३७२. वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंता संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांस लायसन्स देणे.—**

(१) आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी (एक) सर्वेक्षक; (दोन) वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंता ; (तीन) संरचना संकल्पचित्रकार; (चार) बांधकाम लिपिक; किंवा (पाच) नळकारागीर म्हणून काम करण्यासाठी एका वर्षाच्या मुदतीसाठी नवीकरण करता येईल असे लायसन्स देता येईल.

(२) अशा व्यक्तीस, उपविधीन्वये विहित करण्यात येईल अशी अर्हता किंवा अनुभव, किंवा दोन्ही असल्याखेरीज, पोट-कलम (१) अन्वये कोणतेही लायसन्स दिले जाणार नाही.

(३) अर्जदारास, उपविधीअन्वये विहित केलेली अर्हता आणि अनुभव असेल तर, अक्षमता, गैरवर्तणूक किंवा अन्य गंभीर कारणांमुळे अर्जदार असे लायसन्स धारण करण्यास अयोग्य आहे या कारणावरून असेल त्याव्यतिरिक्त, लायसन्ससाठी केलेला कोणताही अर्ज नाकारता येणार नाही.

(४) आयुक्ताने पोट-कलम (३) अन्वये लायसन्ससाठी करण्यात आलेला कोणताही अर्ज नाकारला तर, त्याने, अर्जदाराच्या विनंतीवरून कोणताही आकार न घेता, असा अर्ज नाकारण्यासंबंधीची त्याची कारणे अशा अर्जदारास आपल्या सहीने लेखी कळविली पाहिजेत.

**३७३. सर्वेक्षक इत्यादींच्या मार्गदर्शनासाठी आदेश विहित करता येतील.—**

(१) आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, अनुक्रमे लायसन्सदार, सर्वेक्षक, वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी आदेश काढता येतील.

(२) अशा रीतीने विहित करण्यात आलेल्या त्या वेळी अमलात असलेल्या सर्व आदेशांच्या प्रती, आयुक्त ठरवील अशा किमतीस नगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येतील आणि त्याची एक प्रत, अशा कार्यालयात सर्व वाजवी वेळी पाहणीसाठी ठेवण्यात आली पाहिजे.

**३७४. स्थायी समितीने लायसन्सदार, नळकारागिरांची फी आणि आकार विहित करणे.—**

स्थायी समितीस, लायसन्सदार नळकारागिरांनी या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या कोणत्याही कामासाठी त्यांना द्यावयाची फी किंवा आकार वेळोवेळी विहित करता येतील, आणि कोणत्याही लायसन्सदार नळकारागिरास, अशा कोणत्याही कामासाठी अशा रीतीने विहित केलेल्या फी किंवा आकारापेक्षा अधिक फी किंवा आकार मागता किंवा स्वीकारता येणार नाहीत.

Scanned with CamScanner